ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No 175

वर्ष ३६ | पुणे, बुधवार, १९ ऑगस्ट, १९७० | अंक १६



### कलकत्त्यामधील आरोग्यघातक दूषित हवा

मध्यवर्ती आरोग्य खात्यातील एंजिनिअर्सच्या संशोधन शाखेने गेल्या वर्षी कलकत्ता शहरांतील दूषित हवेची तपासणी केली. तपासणीवरून काढण्यात आलेले निष्कर्ष आता जाहीर करण्यात आले आहेत. इतर मोठ्या शहरांप्रमाणेच कलकत्त्यांतही अनेक मोटारी एकसारख्या धावत असतात. मोटारीतून कार्बन मोनोक्साईड नावाचा वायू प्रामुख्याने बाहेर पडत असतो. त्यामुळे वायुमिश्रित धुराने कलकत्त्याची हवा खूपच दूषित झालेली तपासणीत आढळून आली. निदान या बाबतीत तरी कलकत्ता शहर परदेशांतील न्यूयॉर्क, शिकागो, लंडन, इत्यादी शहरांच्या मागे नाही. भारतामधील इतर मोठ्या शहरांतूनही मोटारींची वर्दळ गेल्या काही वर्षांत वेगाने वाढली आहे. अर्थातच रस्त्यावरील हवेत मोटारीच्या धुराचे प्रमाणही वाढले आहे. परदेशातील मोठ्या शहरांच्या मानाने भारतामधील शहरात मोटारी कमी आहेत. परंतु तरी-सुद्धा दूषित हवेची तीव्रता तितकीच आहे असे आढळून आले. ह्याचे कारण असे सांगण्यात येत आहे की भारतात जुन्या मोटारी अगदी मोडकळीस येईपर्यंत वापरण्यात येतात. त्यांची इंजिने जुनी झाली असल्यामुळे त्यांत जळणाचे पूर्ण ज्वलन होत नाही आणि धुराचे प्रमाण वाढते. कार्बन मोनोक्साईड हा वायू आरोग्याला घातक आहे. कारण या वायूने प्रमाणाबाहेर मिश्रित असलेली हवा श्वासोच्छवासात आल्यास रक्ताच्या प्राणवायू वाहून नेण्याच्या प्रक्रियेत अडथळा उत्पन्न होतो. मोटारीतून बाहेर पडणाऱ्या धुराचे प्रमाण कमी करण्याचा सोपा व अल्प खर्चाचा उपाय उपलब्ध नाही. त्यासाठी एंजिनातच फार मोठे बदल करावे लागतील असे तज्ज्ञ म्हणतात.

---

### मीठ फार खाण्यातील धोका

आहारात मिठाचे प्रमाण वाजवीपेक्षा फार असल्यास आरोग्याला धोके उत्पन्न होतात, असा निष्कर्ष रशियन शास्त्रज्ञांनी संशोधन करून काढला आहे. आहारात मिठाचे प्रमाण फार असेल तर हृदयविकार, प्लीहेचे विकार, मूत्राशयाचे विकार आणि पोटाचे विकार होण्याची शक्यता वाढते असे त्यांचे म्हणणे आहे. रशियन शास्त्रज्ञांनी प्रयोगासाठी बघून जातीच्या माकडांचा वापर केला. शिवाय ज्या भागांतील पिण्याच्या पाण्यांत क्षार अधिक प्रमाणांत असतात अशा ठिकाणच्या रोग्यांचा अभ्यासही केला. युक्रेन, जपान, कॅनडा, झेकोस्लोव्हाकिया आणि बहामा बेटे येथील पाण्यात क्षाराचे प्रमाण अधिक आहे. तेथील रोगी अभ्यासासाठी निवडण्यात आले होते. अतिक्षारयुक्त पाण्याच्या सेवनाने शरीरांतील सर्वच व्यापार दोषयुक्त होतात असा त्यांचा अभिप्राय आहे.

---


**सरदारगृह**

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण

-- आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [तार–सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

आपल्या व आपल्या कुटुंबियांच्या भविष्यकालीन सर्व प्रकारच्या तरतुदी साठी —

**पेन्शन**

योजना.....

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

स्थापना : १९३६

शेड्युल्ड बँक

महाराष्ट्रांत सर्वत्र शाखा.

कोणत्याही शाखेत भेटा.

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.**

मुख्य कचेरी : चिरमुले निकेतन, राजपथ, सातारा.

## ☆ अर्थ ☆

बुधवार, १९ ऑगस्ट, १९७०



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

### आर्थिक परिस्थिती सुधारण्याची चिन्हे

गेल्या काही महिन्यात देशातील किमती चढण्याची प्रवृत्ती दिसून येऊ लागली होती. त्यामुळे दिल्लीमधील सरकारी गटात काहीशी अस्वस्थता वाटत होती. अजूनही ही प्रवृत्ति तशीच असली तरी तिची तीव्रता कमी झाल्याचे मानण्यात येत आहे. किमतीत वाढ होण्याची प्रक्रिया फार काळ टिकणारी नाही असे जाणकारांचे मत आहे. ह्याची कारणे अनेक सांगण्यात येतात. एकतर लागोपाठ ४ थ्या वर्षी पावसाचे मान एकंदरीने ठीक आहे. त्याचा परिणाम म्हणून अन्नधान्याचे उत्पादन समाधानकारक आहे. आतापर्यंतच्या धान्योत्पादनातील उच्चांक भारताने गाठला आहे. सुमारे १०.६ कोटी टन अन्नधान्याचे उत्पादन झाले आहे. अर्थव्यवस्थेच्या औद्योगिक विभागाला लागणाऱ्या व्यापारी पिकांच्या उत्पादनातही वाढ झाली आहे. तागाचे पीक मात्र समाधानकारक नाही. कारण पावसाची उशिरा हजेरी. औद्योगिक उत्पादनाचा १९६९ सालाच्या फेब्रुवारीत जो निर्देशांक होता त्याच्याशी तुलना करता १९७० च्या निर्देशांकात ५.५ टक्क्यांनी वाढ झालेली दिसून येते. निर्यातीतील वाढ अपेक्षेप्रमाणे झाली नसली तरी वाढ होत राहिली आहे. १९७० च्या एप्रिल व मे महिन्यात २४७ कोटी रुपये किमतीच्या मालाची निर्यात झाली. १९६९ सालातील ह्याच महिन्यातील निर्यात मालाची किंमत २३५.६ कोटी रुपये होती. बँकांनी दिलेल्या कर्जापैकी बहुतेक पैसा ग्राहकोपयोगी वस्तू खरेदी करण्यात खर्च होताना दिसतो. ही मात्र चिंतेची बाब आहे. वास्तविक आर्थिक जीवनाचा अधिक विकास करण्यासाठी आणि उद्योगधंद्याचा पाया भक्कम करण्यासाठी त्याचा उपयोग व्हावयास पाहिजे.

---

### वातावरण संशोधनासाठी भारताला रशियाचे सहकार्य

अग्निबाणांचा उपयोग युद्धासाठी करण्यात येऊ शकेल त्याचप्रमाणे तो शांततामय संशोधनासाठीही करता येतो. भारतासारख्या शेतीप्रधान देशाला अग्निबाणांचा उपयोग हवामानाच्या संशोधनासाठी अधिक चांगल्या रीतीने करता आला तर ते इष्टच ठरेल ह्या दृष्टीने रशिया आणि भारत ह्यांच्या दरम्यान झालेला अग्निबाण विषयक करार महत्त्वाचा समजला पाहिजे. हा करार दीर्घ मुदतीचा असून हवामानाचे संशोधन करण्यासाठी उभयता देशांनी संयुक्तपणे अग्निबाण सोडण्याचे ठरविले आहे. थुंबा येथील केंद्रावरून सध्या भारत असे अग्निबाण सोडत आहेच. परंतु या अग्निबाणांच्या साह्याने केंद्रावरून सोडण्यात येणारे फुगे सध्या ३० किलोमीटर उंचीपेक्षा अधिक उंची गाठू शकत नाहीत. रशियाने ह्या कामासाठी अधिक मोठी रॉकेट्स पुरविण्याचे कबूल केले आहे. ह्या अग्निबाणांचे इंधन घनरूप असेल आणि ते संशोधनविषयक उपकरणे १०० किलोमीटर उंचीपर्यंत फेकू शकतील. हवामानाच्या संशोधनाच्या ह्या संयुक्त कार्यक्रमास ह्या वर्षअखेर प्रारंभ करण्यात यावयाचा आहे. १९७०–७१ साली ५० ते ७० अग्निबाण थुंबा येथील केंद्रावरून सोडण्यात येतील. अग्निबाणांची जुळणी करण्यासाठी आणि ते अंतराळांत फेकण्याचे काम करण्यासाठी रशिआ आपले तंत्रज्ञ पाठविणार आहे.

---

### अमेरिकन तरुणांचा लष्करभरतीला विरोध

अमेरिकन तरुणांत खदखदत असलेल्या अस्वस्थतेचे एक लक्षण हिप्पींच्या रूपाने दिसत आहे. ह्या अस्वस्थतेचे एक प्रमुख कारण म्हणजे १९ वर्षे वयाच्या अमेरिकन तरुणांना लष्करात सक्तीने भरती करण्याचा करण्यात आलेला कायदा. ह्या कायद्यामुळे अमेरिकेत स्फोटक वातावरण निर्माण झाले आहे. गेले कित्येक महिने विद्यापीठातून अशांतता धुमसत आहे. लष्कर भरतीच्या कायद्याला विरोध करून शेकडो अमेरिकन तरुण तुरुंगात गेले आहेत. सुमारे ६० हजार तरुणांनी तर कॅनडालाच प्रयाण केलेले आहे. अमेरिकेने व्हिएटनामच्या युद्धात गुंतून राहणे त्यांना पसंत नाही आणि ह्या युद्धात मरण ओढवून घेण्याची अगर अपंग होण्याचीही त्यांची तयारी नाही. हे युद्ध चुकीचे आणि दुष्ट आहे असा त्यांचा समज आहे. कोणत्याही देशात सक्तीची लष्करभरती ही अप्रियच असते. अर्थात अमेरिकाही त्याला अपवाद नाही. अमेरिकेच्या इतिहासात १८६३, १९१७ आणि १९४० ह्या तीन वेळा सक्तीची लष्करभरती जाहीर करण्यात आली होती. प्रे. लिंकन ह्यांनी १८६३ साली लष्करभरती जाहीर केल्यावर न्यूयॉर्कमध्ये १० दिवस दंगे झाले आणि १ हजार माणसे दगावली. पहिल्या महायुद्धांत काही थोडा काळ सक्तीची लष्करभरती जाहीर करण्यात आली होती. त्यावेळी २ लाख, ५० हजार अमेरिकन तरुणांनी लष्करभरतीच्या अधिकाऱ्यापुढे हजर राहण्याचेच टाळले. दुसऱ्या महायुद्धकाळी मात्र लष्करभरतीला लोकांचा पाठिंबा मिळाला.

## आयुर्विम्याचे हप्ते कमी होणार नाहीत

आयुर्विमा कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. टी. ए. पै ह्यांनी असा अभिप्राय व्यक्त केला आहे की आयुर्विमा उतरण्याचे सध्याचे हप्ते कमी करण्याची शक्यता नाही. देशाच्या आर्थिक विकासासाठी पैसा पुरविण्याचे कार्य नीट पार पाडण्यासाठी सध्याचे हप्तेच चालू ठेवावे लागतील, कमी करणे परवडणार नाही. लोकांजवळ असलेला शिलकी पैसा बचतीच्या रूपाने गोळा करणे ही आजची अतिशय मोठी गरज आहे. अशा परिस्थितीत आयुर्विमा कॉर्पोरेशनजवळ आतापर्यंत जमणारा पैसा कमी होण्यासारखे कोणतेही धोरण त्याने अवलंबणे योग्य होणार नाही. १ हजाराच्या रकमेची विमा पॉलिसी उतरण्यासाठी असलेल्या सध्याच्या दरात १० टक्के कपात करावयाची म्हटले तर ४० ऐवजी ३६ रुपये हप्ता घ्यावा लागेल. परंतु कॉर्पोरेशनला आणि पर्यायाने देशाला त्यामुळे २५ कोटी रुपये तोटा सहन करावा लागेल. ही तूट भरून काढण्यासाठी कॉर्पोरेशनला दरसाल ५०० कोटी रुपयांचा अधिक धंदा मिळवावा लागेल.

---

## रेडिओवरील जाहिरातींचे वाढते उत्पन्न

ऑल इंडिया रेडिओवरून व्यापारी जाहिराती प्रक्षेपण करण्याच्या उपक्रमाला चांगले यश प्राप्त झाले आहे. गेल्या वर्षी व्यापारी जाहिरातींना दिलेल्या वेळाच्या फीच्या रूपाने संघटनेला २·३० कोटी रुपयांची ठोक प्राप्ती झाली. त्यामुळे उत्तेजन पावून 'विविध भारती' प्रस्तुत करणाऱ्या आणखी ११ केंद्रांवरून व्यापारी जाहिराती सांगण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या फक्त ४ प्रमुख प्रक्षेपण केंद्रावरून जाहिराती प्रसृत करण्यात येत असतात. भारतात रेडिओची संख्याही झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे परवाना फीतही चांगली भर पडत आहे. ह्या वर्षी रेडिओच्या परवाना फीचे उत्पन्न १० कोटी रुपयांपर्यंत जाईल असा अंदाज आहे.

---

## पराभूत पार्लमेंट–सभासदांची दुरवस्था

गेल्या जूनमध्ये झालेल्या ब्रिटिश सार्वत्रिक निवडणुकीत मजूर पक्षाचे बरेच सभासद पराभूत झाले. त्यामुळे त्यांचे हाल सुरू झाले. त्यांपैकी एक जण —ॲलन ली विल्यम्स—हा लंडनमधील एका उद्यानात ट्रॅक्टर ड्रायव्हर म्हणून काम करीत आहे. पार्लमेंटचा सभासद असताना त्याला दर आठवड्याला १,५०० रु. मिळत; आता त्याला फक्त ३४० रु. मिळतात. मजूर पक्षाने आपल्या पक्षाच्या प्रत्येक पराभूत सभासदाला निकडीच्या गरजा भागविण्यासाठी २,००० रु. दिले.

---

"स्वस्तिक"चे जॉ. मॅनेजिंग डायरेक्टर

# श्री. जी. एस. (दादासाहेब) वैद्य

### ह्यांचा व्यावसायिक जागतिक दौरा

७ ऑगस्टला रवाना; २५ ऑक्टोबरला परत येणार



स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लि., पुणे, चे जॉइंट मॅनेजिंग डायरेक्टर श्री. जी. एस. वैद्य अडीच महिन्यांच्या व्यावसायिक जागतिक दौऱ्यावर जाण्यासाठी ७ ऑगस्ट रोजी मुंबईहून बँकॉककडे रवाना झाले. स्वस्तिकच्या पादत्राणाबरोबरच ऑइल सील्स, होजेस आणि इतर अनेक प्रकारची उत्पादने ह्यांच्या विक्रीबाबत ते व्यापारी वर्गाशी चर्चा करतील. २५ ऑक्टोबरच्या सुमारास ते भारतात परत येतील.

---

## दक्षिण आफ्रिकेतील महिलेचा गृहत्याग

दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग शहरातील एक विवाहित महिला आपला पति, दोन मुले आणि सुखसोयींनी युक्त असे घर सोडून भारतात कायमचे राहण्यासाठी येणार आहे. तिचे वय ३१ असून शहरातील एका मोठ्या वकिलाची ती मुलगी आहे. तिचे योगमार्गावरील प्रेम तिला संसारात राहू देत नाही. विवाह होऊन १४ वर्षे झाल्यावर आणि दोन मुले झाल्यावर संन्यास घेण्याच्या तिच्या हेतूला तिच्या पतीकडून अर्थातच विरोध होत आहे. हे प्रकरण अखेर कोर्टात गेले. तेव्हा तिच्या पतीने कोर्टात असे सांगितले की योग तत्त्वज्ञानाने ती अगदी भारून गेलेली आहे. तथापि, तिच्या मालकीचा पैसा असल्याने तिला कोणी अडवू शकत नाही. ह्या बाईचे नाव मिसेस् पेस असे आहे. त्या चांगल्यापैकी कलावंत आहेत. कोर्टात विचारणा करण्यात आली असता स्वतःच्या आध्यात्मिक जीवनाबद्दल काहीही बोलण्यास त्यांनी नकार दिला. त्याची वाच्यता करणे आपल्या गुरूला आवडणार नाही असे कारण त्यांनी सांगितले. आपल्या निर्णयाबद्दल बोलताना त्या म्हणाल्या की खुद्द योगमार्गाच्या दृष्टीने सुद्धा पतीला व मुलांना सोडून जाणे बरोबर नाही. पण हा निर्णय घेतल्याशिवाय गत्यंतरच नव्हते. तो घेताना अतिशय मानसिक क्लेश सहन करावे लागले अशी कबुलीही त्यांनी दिली आहे. आता त्या गुरूच्या सांगण्याप्रमाणे वागत असून पूर्णपणे शाकाहारी बनल्या आहेत.

---

## जगातील सर्वांत श्रीमंत लेखक

### प्रकाशक त्याला पुस्तकासाठी १ कोटी रु. अॅडव्हान्स देतात !

हॅरॉल्ड रॉबिन्स हा जगातील आजचा सर्वांत श्रीमंत लेखक आहे. गेल्या १२ वर्षांत, त्याच्या १० खूप खपाच्या पुस्तकांनी त्याला सुमारे १६ कोटी रुपये मिळवून दिले आहेत. पुस्तकाची एकही ओळ लिहून होण्यापूर्वी त्याला प्रकाशक एक कोटी रुपये देण्यास तयार होतात. "दि ड्रीम मर्चन्ट्स," "दि कार्पेट बॅगर्स", "दि अॅडव्हेन्चरर्स," इत्यादी त्याच्या पुस्तकांनी त्याला अमाप पैसा दिला. त्याच्या कोणत्याही पुस्तकाचा वार्षिक खप ६,००,००० प्रतींपेक्षा कमी नाही. एकट्या "दि कार्पेट बॅगर्स" पासूनच त्याला ४ कोटी रु मिळाले. दारूबंदीच्या काळात त्याने चोरून दारू पोचती करण्याचे काम केले. खोटे वय सांगून १५ व्या वर्षीच तो नाविक दलात दाखल झाला. आता त्याचे जीवन सुखात स्थिरावले आहे. तो वर्षातले सहा महिने अमेरिकेत आणि सहा महिने आपली चौथी पत्नी ग्रेस आणि पाच वर्षांची कन्या अॅड्रिना यांच्या समवेत फ्रान्समध्ये राहतो. तेथेच त्याचे बहुतेक सर्व लेखन होते. दर महिन्यातील एक आठवडा तो न्यूयॉर्कला जाऊन येतो. त्याच्या लेखनाची दिनचर्या अशी असते. पहाटे ५ वाजता तो खोली बंद करून लिहायला बसतो, ते दुपारच्या २ वाजेपर्यंत. "दि अॅडव्हेन्चरर्स" पुस्तक पुरे करण्यासाठी तो एकदा ३० तास सतत टाइप करीत बसला होता !

त्याला मिळणारा बहुतेक पैसा कुटुंबाच्या ट्रस्ट फंडात घातला जातो. बाकीचा खर्चला जातो. "मला मजा करायला आवडते." असे तो म्हणतो. १० वर्षांपूर्वी मॉंटे कार्लो येथे त्याने २ तासांत २० लक्ष रुपये जुगारात घालविले होते, तेव्हा त्याने हॉटेलचे बिल भागविण्यासाठी स्वतःची कॅडिलॅक गाडी तिथल्या-तिथे दीड लक्ष रुपयांना विकली, बिल देऊन टाकले आणि तो अमेरिकेला विमानाने परतला.

रॉबिन्सचे चार वेळा लग्न झाले; त्यापैकी दोन वेळा त्याच स्त्रीशी. "पहिल्यांदा तिच्याशी लग्न केले, ही मोठीच चूक झाली; दुसऱ्यांदा केले ही तर घोडचूक" असे त्याने म्हटले आहे. रॉबिन्स शाळेत शिकलेलाच नाही. पत्रव्यवहाराच्या कोर्सने तो थोडेफार शिकला हिशेबाचे ज्ञान त्याने पुस्तके वाचून मिळविले. रेसकोर्सवरील बुकीकडे काम करतेवेळी त्याने स्मरणशक्ती वाढविली. सध्या तो सुटी उपभोगीत आहे. सुटी संपल्यावर तो पुनः नवे पुस्तक लिहिण्यास बसेल. २०० कथानके त्याच्या डोक्यात आहेत. लहानपणी त्याला तीन गोष्टी मिळविण्याचा ध्यास होता— कॅडिलॅक, हिऱ्याचे रिस्टवॉच आणि सुंदर स्त्री. कालांतराने तिन्ही त्याने मिळविल्या.

---

## पूर्व पाकिस्तानला पाणीपुरवठा करण्यासाठी मदत

पूर्व पाकिस्तानांतील एका पाणीपुरवठ्याच्या योजनेसाठी कॅनडाने ६५ लाख अमेरिकन डॉलर्सचे कर्ज देण्याचे मान्य केले आहे. ही योजना पूर्ण करण्यासाठी पाकिस्तानला ४ कोटी, ४६ लाख डॉलर्स खर्च येईल असा अंदाज करण्यात आला आहे. कॅनडाच्या आंतरराष्ट्रीय विकास संघटनेतर्फे ही मदत देण्यात येणार असून कर्जावर व्याज आकारण्यात येणार नाही. योजनेच्या पहिल्या टप्प्यासाठी येणाऱ्या खर्चापैकी जो खर्च परदेशीय चलनात करावा लागेल, त्यापैकी एक तृतीयांश खर्च कर्जाच्या रकमेतून करण्यात यावयाचा आहे. कॅनडाशिवाय जागतिक बँकेची आंतरराष्ट्रीय विकास शाखा आणि स्वीडन ह्यांनीही योजनेसाठी २ कोटी डॉलर्सचे कर्ज देण्याची तयारी दाखविली आहे. स्थानिक स्वरूपाचा खर्च पाकिस्तानला करावा लागेल.

---

## मुस्लीम जगांतील आजारी देश : पाकिस्तान

पाकिस्तानचे अध्यक्ष याह्याखान ह्यांचे एका वेळचे सहकारी एअर मार्शल नूरखान ह्यांनी राजकारणाच्या आखाड्यांत प्रवेश केला आहे. पाकिस्तानच्या सद्यःपरिस्थितीविषयी कराची येथे जाहीर सभेत बोलताना ते म्हणाले की पाकिस्तान हा मुस्लीम जगांतील एक आजारी देश आहे. पाकिस्तानमधील लोक आणि राज्यकर्ते ह्यांच्यात संपूर्ण अविश्वास नांदत असून त्यांचे परस्परसंबंध पूर्णपणे दुरावलेले आहेत. वास्तविक, पाकिस्तानने एक आदर्श मुसलमान देश म्हणून आपली घडण बनवावयास पाहिजे होती. पण झाले मात्र उलटेच. आज पाकिस्तानांत बेकारी, निरक्षरता आणि दरडोई अत्यंत कमी उत्पन्न ह्यांनी विलक्षण गोंधळ निर्माण केला आहे. राष्ट्रीय जीवनाच्या सर्व क्षेत्रांत पाकिस्तानची पिछेहाट झाली आहे.

---

## अवकाश संशोधनाच्या कार्यक्रमावर टीका

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरच्या पर्वात जर्मनीने ब्रिटनवर अग्निबाणांचा मारा केला. तेव्हापासूनच अवकाश संशोधनाबाबतची पहिली पावले टाकली गेली. जर्मनीच्या व्ही२ रॉकेटच्या केंद्रात काम केलेल्या एका जर्मन तज्ज्ञाने सध्या चालू असलेल्या अवकाश संशोधनावर कडक टीका केली आहे. त्याच्या मताने संशोधकांनी समोर ठेवलेल्या उद्दिष्टांमुळे पुढील अनेक वर्षे अंतराळाचा उपयोग मनुष्याच्या हितासाठी करणे अशक्य होणार आहे. अवकाश संशोधनांत झालेली प्रगती मान्य करूनही आपले हेच मत असल्याचे त्याने नमूद केले आहे. अंतराळांत घिरट्या घालणाऱ्या यानात मनुष्याचे वजन कमी होते. त्याचा फायदा घेऊन उपग्रहात आजारी माणसासाठी इस्पितळासारखी सोय करावी, असे त्याने सुचविले आहे.

## मधाचे उत्पादन वाढविण्याच्या प्रयत्नांना यश

मधमाशा पाळून मधाचे उत्पादन वाढविण्याचा एक महत्त्वाकांक्षी प्रयोग पंजाबमधील शेतकी विद्यापीठाने ५ वर्षांपूर्वी हाती घेतला होता. ह्या प्रयोगाचे ठिकाण पालमपूर हे होते. आता हें गाव हिमाचल प्रदेशात गेले आहे. भारतामधील मधमाशा आणि परदेशातून आयात केलेल्या मधमाशा ह्यांचा संकर करून अधिक मध देणारी पोवळी निर्माण करण्याचा हा प्रयोग बराच काळपर्यंत यशस्वी होऊ शकला नाही. कारण, परदेशातून आणलेल्या मधमाशा भारतातील हवामानात टिकू शकल्या नाहीत. आता मात्र इटलीमधील मधमाशांशी संकर करून पैदास केलेल्या मधमाशांनी पोवळी बांधण्यास प्रारंभ केला असून अशा एका पोवळ्यातून ५१ किलोग्रॅम मध एका वर्षात मिळू शकतो असे आढळून आले आहे. तथापि, इटलीमधील अगर दक्षिण आफ्रिकेतील पोवळ्यापासून मिळणाऱ्या मधाच्या मानाने ही मधाची प्राप्ती फार आहे असे नाही. इटलीत व आफ्रिकेत प्रत्येक मधाचे पोवळे वर्षाकाठी १०० किलोग्रॅम इतका मध देऊ शकते. असे असले तरी भारतामधील पोवळ्यांच्या सध्याच्या वार्षिक उत्पादनाच्या मानानें ५१ किलोग्रॅम निर्मिती बरीच म्हणावी लागेल. कारण, भारतामधील मधाची पोवळी वर्षात सरासरी ४·५ किलोग्रॅम मधच देऊ शकतात. पालमपूर येथे यशस्वी झालेला प्रयोग भारतात इतर ठिकाणीही यशस्वी झाला तर मधाच्या उत्पादनाच्या दृष्टीने तीं एक मोठी क्रांतीच ठरेल. शेतीच्या विकासासाठीही मधमाशांच्या वाढत्या थव्यांचा फार उपयोग होऊ शकेल. मधमाशा ह्या वनस्पतीमधील पुंकेसर आणि स्त्रीकेसर ह्यांचा संयोग घडवून आणण्याचे महत्त्वाचे काम करीत असतात.

---

## तुरुंगांतील जीवन सुखी करण्यासाठी शाळा

मुंबईत पाकिटमारीचे पद्धतशीर शिक्षण देण्याच्या शाळा आहेत असे म्हणतात. ही झाली गुन्हेगारीचे शिक्षण देणारी शाळा. पण तुरुंगवास भोगावा लागला तर तेथे जास्तीत जास्त सुखी कसे राहावे ह्याचे शिक्षण देणारी एक शाळा इटलीमधील नेपल्स शहरातील एका कल्पक नागरिकाने काढली आहे. इटलीमधील कायदेकानू आणि नियम ह्यांच्या जाळ्यातून पळवाटा काढून असे सुखी जीवन घालविणे शक्य असल्याचा त्याचा दावा आहे. त्याने शाळेच्या उद्देशपत्रिकेत असे म्हटले आहे की तुरुंगातील जीवन समाधानकारक घालविणे शक्य आहे. पण, त्यासाठी नियम न मोडता जास्तीत जास्त फायदा कसा घ्यावा ते शिकलें पाहिजे. कैद्याने आपल्या हक्कांची, सवलतींची नीट माहिती करून घेतलेली असली पाहिजे. जरूर तर, कदीं वापरतात तीं परिभाषाही शिकली पाहिजे.

---

## हवा शुद्ध राखण्यासाठी मोटारींना बंदी

कारखान्यांच्या वाढीमुळे मोठ्या शहरातील हवा आरोग्याला घातक होऊ लागते. अलीकडेच टोकिओ शहरांत कारखान्यांच्या धुराड्यातून बाहेर पडणाऱ्या विषारी वायूमुळे अनेक लोक आजारी पडले होते. ह्यापासून बोध घेऊन टोकिओमधील पोलिस खात्याने शहरांतील व्यापारी वर्दळीच्या भागात एक दिवस सर्व मोटारींना बंदी केली. मोटारीतून बाहेर पडणाऱ्या धुरामुळे हवा खराब होण्यास आणखीच मदत होते. १३ किलोमीटर लांबीच्या रस्त्यावरील हवा त्यामुळे बरीच सुधारली. त्या दिवशी रस्त्यावरून फक्त पादचाऱ्यांनाच जाण्यायेण्याची परवानगी होती. शहरांतील रस्त्याप्रमाणेच बोटीच्या धक्क्या जवळील रस्तेही ५ तास पर्यंत मोटारींना बंद करण्यात आले होते. त्याचा चांगला परिणाम झाला.

---

## जगांतील सर्वांत मोठ्या १०० बँकांत एकही भारतीय बँक नाही

जगातील सर्वांत मोठ्या १०० बँकांत एकाही भारतीय बँकेचा समावेश नाही. 'अमेरिकन बँकर' ने तयार केलेल्या यादीप्रमाणे, जगातील सर्वांत मोठ्या ५०० बँकांच्या यादीत सहा हिंदी बँकांचा समावेश होऊ शकतो. त्या पुढीलप्रमाणे :— स्टेट बँक ऑफ इंडिया (क्रमांक ११९), सेंट्रल बँक ऑफ इंडिया (२६६), पंजाब नॅशनल बँक (३३५); बँक ऑफ बरोडा (३५४) आणि युनायटेड कमर्शिअल बँक (४६६). सर्वात मोठ्या ५०० बँकांपैकी १८७ बँका अमेरिकेतील आहेत.

---

**हरिदास मुंधरांची कर थकबाकी** — श्री. हरिदास मुंधरांची प्राप्तीकराची एकूण थकबाकी ३१ मार्च, १९६९ रोजी १, ८७, ३७, ००० रु. होती. ३१ मार्च, १९६८ रोजी ती ३, ५९, ६१, ००० रु. होती. काही कर-आकारणी रद्द केल्यामुळे थकबाकीचा आकडा कमी झाला.

**विमा पॉलिसीवर कर्ज महाग होणार** — विमा पॉलिसीवर ला. इं. कॉर्पोरेशन सध्या ७% दराने कर्ज देते. व्याजाचा दर आता ७½% करण्यात येणार आहे.

**पकडलेले चोरटे सोने**— एप्रिल, १९६९ ते जून, १९७० ह्या मुदतीत जप्त करण्यात आलेले सोने, चांदी इत्यादींची किंमत ३०·२२ कोटी रु. भरली.

**इन्कमटॅक्सची थकबाकी**— ३१ मार्च, १९७० रोजी इन्कमटॅक्सची थकबाकी ५०७·९१ कोटी रु. होती.

**धोक्याची साखळी** आगगाडीच्या डब्यातील धोक्याची साखळी जून, १९६९ ते मे, १९७० ह्या काळात भारतातील सर्व विभागात मिळून एकूण २,७२, ७२५ वेळी ओढण्यात आली.

## तरुणांत फैलावलेली अस्वस्थता

आजच्या जगातील सर्वच देशांतील तरुणांत अस्वस्थता माजलेली आहे. मागासलेल्या देशांत दारिद्र्य मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे तरुणांत वैफल्य फोफावले आहे असे मानले जाते. परंतु अमेरिकेसारख्या श्रीमंत देशातील तरुणही अनेक कारणांनी असंतुष्ट आहेत. अमेरिकेतील अनेक तरुण मादक औषधे घेताना आढळतात. अशा प्रकारची औषधे घेणाऱ्या अगर अमली पदार्थ सेवन करणाऱ्या अमेरिकन तरुणांची संख्या जवळ जवळ १० लाखांपर्यंत आहे. कॉलेजांमधून पदवी परीक्षांचा अभ्यास करणारे विद्यार्थी, शाळकरी विद्यार्थी, इतकेच नव्हे तर १३-१४ वर्षांची मुले-मुलीही ह्या व्यसनातून सुटलेली नाहीत.

---

## सुदानच्या बाजारपेठेला भारत मुकत आहे

सुदान पाकिस्तानकडून तागाच्या मालाची आयात करण्याचा विचार करीत आहे. भारताकडून तागाचा माल मिळविणे त्याला अवघड होत चालले आहे. त्यासाठी सुदानला दुर्मिळ चलनाच्या रूपात किंमत द्यावी लागेल. भारत आणि सुदान ह्यांच्यात झालेल्या व्यापारी करारास अनुसरून रुपयाच्या चलनात किंमत देऊन सुदान तागाच्या मालाची आयात करीत असे. परंतु ह्या व्यापारासंबंधी सुदानच्या सरकारला चांगला अनुभव आला नाही. जून १९७० पर्यंत संपणाऱ्या वर्षात भारताने सुदानला ३ लाख पौंड किमतीच्या तागाच्या मालाचा पुरवठा करावयाचा होता. परंतु प्रत्यक्ष मात्र २ लाख पौंड किमतीच्या मालाचाच पुरवठा होऊ शकला. त्यामुळे सुदानला इतर देशांकडून माल आणण्याची खटपट करावी लागत आहे.

---

## आस्वान धरणापासून विजेचा पुरवठा

रशिआच्या मदतीने इजिप्तमधील नाइल नदीवर बांधण्यात येणारे आस्वान येथील प्रचंड धरण नुकतेच पूर्ण झाले आहे. धरणावरील वीज निर्माण करणारी काही टर्बाइन्स विजेचा पुरवठाही करू लागली आहेत. इजिप्तच्या अर्थव्यवस्थेत ह्या धरणाला फार महत्त्वाचे स्थान आहे. धरणाच्या कामाला १९६० मध्ये प्रारंभ करण्यात आला. आतापर्यंत ८ लाख, ३६ हजार एकर जमीन नव्याने ओलिताखाली आणण्यात आली आहे. आतापर्यंत ह्या जमिनीला नदीला येणाऱ्या पुराच्या वेळीच हंगामी पाणीपुरवठा होऊ शकत असे. त्याशिवाय पाण्याच्या अभावी मुरमाड झालेली व ओसाड पडलेली ८ लाख, ५० हजार एकर जमीन आता लागवडीसाठी योग्य करण्यात आली आहे. धरणात साठविलेल्या पाण्याचा पूर्णपणे फायदा घेण्यात येऊ लागल्यावर इजिप्तच्या तांदळाच्या उत्पादनात १० लाख टनांची भर पडणार आहे. विजेमुळे उद्योगधंदेही निघणार आहेत.

---

## पुण्यात अश्विनी सहकारी रुग्णालयाची पूर्वतयारी

वेताच्या, परवडणाऱ्या मोबदल्यात सर्वसामान्य लोकांना सर्व वैद्यकीय उपचार उपलब्ध करून द्यावेत ह्या हेतूने सहकारी तत्त्वावर एक अद्ययावत हॉस्पिटल काढण्याचे प्रयत्न पुणे येथे चालू आहेत. संस्थापकांत काही प्रमुख डॉक्टरांबरोबर काही प्रमुख नागरिकांचाही समावेश आहे. रुग्णांना त्यांच्या उत्पन्ना-प्रमाणे दर आकारले जातील. भागधारकांना फीमध्ये १० टक्के सूट मिळेल. हॉस्पिटलच्या उभारणीस सुमारे १६ लक्ष रु. खर्च येईल. भागांच्या विक्रीपासून दोन लक्ष रुपये, महाराष्ट्र सरकारचे चार लक्ष रुपयांचे भांडवल, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे १० लक्ष रुपये कर्ज, अशी अर्थव्यवस्था केली जाईल. प्रारंभी ७५ रुग्णांच्या खाटांची सोय होईल.

---

## विमा पॉलिसींचे क्लेम त्वरित मंजूर करणार

आयुर्विमा कॉर्पोरेशन दररोज १,००० क्लेम तपासून मंजूर करते. हे काम विम्याचे काम करणाऱ्या एजंटाकडेच सोपवून विमेदाराच्या मृत्यूनंतर १२ दिवसातच क्लेमचे पैसे वारसांना मिळण्याची व्यवस्था करता येईल काय, ह्याचा विचार कॉर्पोरेशन करीत आहे.

---


कुलाबा जिल्ह्यातील पहिल्या आणि
बँकेच्या ४६ व्या शाखेचे

**गोरेगांव ( जि. कुलाबा )**

मेहता इमारत, बाजार पेठ, येथे

शनिवार दि. १५।८।७० रोजी स्वातंत्र्यदिनाच्या सुमुहूर्तावर

**★ उद्घाटन ★**

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.**

वि. श्री. दामले — अध्यक्ष.
गो. श्री. दिवाण — शाखाधिकारी.

स्थापना १९३६ – शेडयूल्ड बँक.

मुख्य कचेरी— चिरमुले निकेतन, राजपथ, सातारा.

## निर्यात करणाऱ्या उद्योगधंद्यांवरच भर देणे अयोग्य

म्हैसूर राज्य उत्पादकता मंडळाच्या विद्यमाने स्वित्झर्लंडमधील राज्यशास्त्राचे प्राध्यापक डॉ. शालर ह्यांचे भारताच्या अर्थव्यवस्थेसंबंधी बंगलोर येथे भाषण झाले. आपल्या भाषणात ते म्हणाले की भारत निर्यात करणाऱ्या उद्योगधंद्यांच्या विकासाकडे अधिक लक्ष देतो. असे करताना लोकांच्या गरजा भागविण्याकडे दुर्लक्ष झाले तरीही त्याची पर्वा करण्यात येत नाही. वास्तविक भारतामधील लोकांच्या अनेक गरजा पूर्ण झालेल्या नाहीत; परंतु निर्यातीकडे अधिक लक्ष देऊन मग लोकांच्या गरजा भागवाव्यात असे सरकारचे धोरण आहे. देशांतर्गत अर्थव्यवस्थेचा विकास साधण्यासाठी निर्यातीने मिळणाऱ्या पैशावर अवलंबून राहण्याचे धोरण त्याने स्वीकारले आहे. आर्थिक विकासाची काही विशिष्ट पातळी गाठल्याशिवाय देशातील बाजारपेठांत मागणी असणाऱ्या ग्राहकोपयोगी जिनसा तयार करण्याकडे पुरेसे लक्ष देता येणार नाही अशी त्याची धारणा आहे. परंतु आर्थिक विकासाचे असे भाग पाडता येत नाहीत. अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक विभागाची वाढ एकाच वेळी होत राहिली पाहिजे. उद्योगधंद्यांच्या स्थापनेच्या बाबतीत अग्रक्रमच द्यावयाचा झाला तर ज्या उद्योगधंद्यांत अधिकात अधिक नफा होतो अशा उद्योगधंद्यांना दिला पाहिजे. त्यामुळे बचत होणे शक्य होईल. विकासाठी लागणाऱ्या पैशाचा पुरवठा फक्त बचतीच्या रूपानेच उभा करता येईल. केवळ निर्यातीला पोषक अशा प्रकारच्या उद्योगधंद्यांची स्थापना करून चालणार नाही. कारण असे धंदे नफ्यात चालतीलच असे सांगता येणार नाही. नफ्यामधूनच भांडवलाचा संचय करता येणे शक्य होते, आणि भांडवलाचा संचय हीच आर्थिक वाढीची प्रेरक शक्ती आहे.

---

## सार्वजनिक मालकीच्या उद्योगधंद्यांना तोटा का होतो?

संमिश्र स्वरूपाच्या अर्थव्यवस्थेत खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांबरोबरच सार्वजनिक मालकीचे उद्योगधंदे स्थापन होणे अपरिहार्यच मानावे लागते. खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांचे पाठीराखे अशी टीका करीत आले आहेत की सार्वजनिक मालकीच्या उद्योगधंद्यांना वर्षानुवर्षे तोटा होत असतो; इतकेच नव्हे तर असा तोटा त्यांना नेहमीच होणार आहे. ह्या अभिप्रायासंबंधी नियोजन समितीचे एक सभासद श्री. आर. वेंकटरामन् ह्यांनी पत्रकारांजवळ बोलताना स्वतःच्या दृष्टिकोनातून खुलासा केला आहे. ते म्हणतात की सार्वजनिक मालकीच्या विभागातील उद्योगधंद्यांना तोटा होत आहे ही गोष्ट खरी; पण त्यासंबंधी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. हे उद्योगधंदे स्थापन होऊन अद्याप फारसा काळ लोटलेला नाही. त्यांना पूर्णावस्था येण्यासाठी काही विवक्षित काळ आवश्यक आहे. त्यानंतरच तोटा येणे बंद होऊ शकेल. त्यांची ही एक प्रकारची गर्भावस्थाच म्हटली पाहिजे. पुढारलेल्या परदेशांत अशा उद्योगधंद्यांना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी सुमारे ७ वर्षांचा अवधी लागतो. भारतात मात्र हा काळ अधिक लागणार आहे. सार्वजनिक मालकीच्या औद्योगिक संघटनांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी नियोजन समितीने काही सूचना केल्या आहेत. कामकाजाची पद्धत सोपी करणे, कारभारात स्वातंत्र्य असणे, काही कारखान्यांच्या उत्पादनपद्धतीत तांत्रिक सुधारणा करणे आणि उत्पादनात विविधता आणणे, अशा सूचनांचा त्यात समावेश आहे. तथापि कार्यक्षमता वाढविण्याचे प्रयत्न ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे.

---

## हौशी प्रवाशांना माहिती पुरविण्याची व्यवस्था हवी

परदेशीय हौशी प्रवासी भारतात आले म्हणजे त्यांच्यापासून परदेशीय चलनाची प्राप्ती होते. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात प्रवासाची साधने सुलभ झाल्यामुळे भारतासारख्या दूर वाटणाऱ्या देशांतही प्रवासी मोठ्या संख्येने येऊ लागले. गेल्या वर्षी सुमारे २ लाख, ४५ हजार प्रवाशांनी भारतपर्यटन केले. १९६८ साली आलेल्या प्रवाशांच्या संख्येशी तुलना करता संख्येत २० टक्क्यांनी वाढ झालेली दिसते. प्रवाशांचा हा ओघ सतत वाढतच जाणार आहे. ह्या प्रवाशांची राहण्याजेवणाची व प्रवासाची सोय चांगली झाली म्हणजे भागले, अशी विचारसरणी ठेवून चालणार नाही. कारण त्यांपैकी बरेच प्रवासी भारताच्या प्राचीन संस्कृतीची पुसट का होईना तोंडओळख करून घेण्यासाठी आलेले असतात. एखाद्या इतिहासप्रसिद्ध स्थळात आज उरलेले अवशेष पाहून त्यांचे समाधान होत नाही. अशा प्रेक्षणीय व सांस्कृतिक महत्त्वाच्या स्थळांबद्दल पुरेशी माहिती मिळावी अशी त्यांची अपेक्षा असते. दुर्दैवाने ती पुरी होत नाही. गेल्या वर्षी एका ब्रिटिश पुराणवस्तुशास्त्रज्ञाने युनेस्कोतर्फे भारताला भेट दिली होती. त्यालाही असाच अनुभव आला. मध्य प्रदेशातील मांडवगड हे एक प्रसिद्ध व मनोहर प्रेक्षणीय स्थळ आहे. पं. जवाहरलाल नेहरू ज्या वेळी ह्या गडावर गेले तेव्हा त्याची उर्जितावस्था आली. त्यापूर्वी तेथील विविध भागांत जाण्यासाठी चांगले रस्तेही नव्हते; मांडवगडासंबंधी अधिकृत माहिती देणारे पुस्तकही मोठ्या प्रयासाने मिळवावे लागले. ह्यावरून इतर प्रवाशांची कशी आबाळ होत असेल ते कळते. भारत सरकारच्या हौशी प्रवासी खात्याने प्रेक्षणीय स्थळांवर त्यांची माहिती देण्याची सुलभ व्यवस्था करावी अशी सूचना करण्यात येत आहे.

---

## टेलिफोनच्या सामग्रीचा दुसरा कारखाना

अलाहाबादजवळ टेलिफोनची सामग्री तयार करण्याचा दुसरा एक कारखाना काढण्याचे भारत सरकारने ठरविले आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी ७ कोटी रु. भांडवल लागणार आहे. कारखान्यात प्रत्यक्ष उत्पादन सुरू होण्यास ४ वर्षांचा काळ लागेल. त्याची उभारणी सर्वस्वी हिंदी इंजिनिअर्स करणार आहेत.

---

**रेल्वे अपघात** — १९६९-७० मध्ये रेल्वेचे एकूण ९६३ अपघात होऊन त्यात २८३ लोकांना मृत्यु आला आणि ७५५ लोक जखमी झाले. मालमत्तेच्या नुकसानीची रक्कम १·२६ कोटी रु. भरली.

**भारताचे परदेशी कर्ज व सावकार**—भारत एकूण २० देशांचा ऋणको असून एकूण कर्जाची रक्कम ६६,८३, ३१,००,००० रुपये आहे.

**दिवाणी दाव्यांची अपिले** – सध्याच्या कायद्याप्रमाणे २०,००० रुपयांवरच्या दिवाणी दाव्याच्या निर्णयावर सुप्रीम कोर्टाकडे अपील करता येते. ही मर्यादा १,००,००० रुपये करणारे बिल राज्यसभेने मंजूर केले आहे. त्यामुळे दिवाणी अपिले तुंबणे कमी होईल.

**टेलिव्हिजन सेट्सच्या आयातीस बंदी** – भारतात पुरेसे टेलिव्हिजन सेट्स तयार होऊ लागले असल्यामुळे, त्यांच्या आयातीसाठी लायसेन्स देण्याचे सरकारने बंद केले आहे.

**डकोटा मोडीच्या भावाने जाणार ?** – इंडियन एअरलाइन्सने आपली १४ जुनी डकोटा विमाने कमीत कमी किमतीस विक्रीस काढली आहेत, पण त्यासाठी एकही गिऱ्हाइक आले नाही. त्यामुळे ती आता मोडीच्या भावाने विकावी लागतील. ही विमाने वापरणे तोट्याचे ठरत आहे.

**कार्डपाकिटावरील बटवड्याचा शिक्का**–कार्डपाकिटावर बटवड्याची तारीख व वेळ दर्शविणारा शिक्का मारण्यात येतो. त्यामुळे बटवड्यास विलंब होतो. काही विभागात शिक्का मारण्याचे बंद करण्याचा प्रयोग करून त्याची प्रतिक्रिया समजून घेण्याचे पोस्ट खात्याने ठरविले आहे.

**साबणाच्या किंमतीत वाढ**–मध्यवर्ती सरकारने अंगाला लावण्याच्या साबणाची किंमत १०० ग्रॅमच्या वडीला ४ पैसे आणि कपडे धुण्याच्या वडीला प्रत्येक किलोग्रॅमला १४ पैसे, अशी किंमत वाढ मंजूर केली आहे.

**फोनसाठी ४·७ वर्षे वाट पाहा** – फोनसाठी अर्ज करणाराला फोन मिळण्यास १९५६ मध्ये एक वर्ष वाट पाहावी लागे; आता ४·७ वर्षे वाट पाहावी लागते. टेलिफोनच्या तारा आणि इतर साहित्ये ह्यांचे उत्पादन वाढले, तरी त्यापेक्षा टेलिफोनची मागणी अधिक गतीने वाढत आहे.

**वाघांची राज्यवार संख्या** — आंध्र प्रदेश ४०, आसाम ५००, बिहार ९०, गुजरात ५, केरळ २०, मध्य प्रदेश ६०० ते १,४००, महाराष्ट्र ३२९, म्हैसूर ११४, नेफा-नागालँड-मणिपूर १००, ओरिसा ३२६, राजस्थान ९०, तामीळनाडु ८१, उत्तर प्रदेश ४०० ते ५०० आणि प. बंगाल ११०. गेल्या ५० वर्षांत वाघांची संख्या किमान ७५ टक्क्यांनी कमी झाली आहे.


**मंत्र्यांचे पगार व भत्ते** – मध्यवर्ती सरकारचे मंत्री आणि उप मंत्री ह्यांचे पगार व भत्ते ह्यावर १९६९–७० मध्ये ४२, ६६, ३९९ रु. खर्च झाला.

---



# विविधोपयोगिता


**किर्लोस्कर पंपांचे हे वैशिष्ट्य होय !**



गेल्या अर्ध शतकाहून अधिक काळ आम्ही अनेक प्रकारच्या उपयोगांसाठी विविध प्रकारचे पंप तयार करीत आहो. किर्लोस्कर पंपाच्या प्रत्येक भागांत आमची श्रेष्ठ दर्जाबद्दलची परंपरा आणि उत्पादनाचा दीर्घ अनुभव व आधुनिक तंत्रज्ञान यांचा संयोग झाला आहे.

विविध प्रकारच्या
किर्लोस्कर पंपांची उपयुक्तता

• शेतीला पाणी पुरवठा • पिकावर पाणी शिंपडण्याच्या योजना • वॉटर वर्क्स • बूस्टर सर्व्हिस • सीवेज • ड्रेनेज • सँडी वॉटर • स्टॉर्म वॉटर • फायर फायटिंग • खाणी • रासायनिक, कागद व साखर कारखाने • प्रोसेसिंग प्लँट्स् • मिहस्कस लिक्विडस् • तेलशुद्धि कारखाने • डेअरीज • डिस्टिलरीज • खत कारखाने




किर्लोस्कर®

**किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड**
उद्योग भवन, टिळक रोड, पुणे-२.



हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ९)